# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०० ००१.
दुरध्वनी क्रमांक : (०२२) २२६२१७६८ फॅक्स क्रमांक : (०२२) २२६१४००३
Website : http://water.maharashtra.gov.in Email : chetan.nikam@nic.in

क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.३२१/पापु-१५ दिनांक : ३ डिसेंबर,२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
पुणे.

**विषय:** सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजनेबाबत

**संदर्भ:** १.शासन परिपत्रक समक्रमांक दि.१८.०८.२०१६
२. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस२०१४/प्र.क्र.८२ /भाग-३ /उद्योग-४/२०१६, दि.०१.१२.२०१६
३.आपलेअ.शा.पत्र क्र.ग्रापापु/यांउवि/सौपुपंयो/२३७/२०१८, दि.२६.०७.२०१८

महोदय,

राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या व्याप्ती या घटकांतर्गत सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा स्तरावर राबविताना करण्यात येणा-या ई-निविदा प्रक्रियेत संदर्भाधिन क्र.१ च्या परिपत्राकान्वये अंशत: सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ई-निविदेद्धारे प्राप्त कमीत कमी दरांनुसार निविदेतील पात्र व इच्छुक कंत्राटदारांचे आवश्यकतेप्रमाणे पॅनल तयार करण्याबाबत व पॅनेलवरील कंत्राटदारामार्फत निविदेतील लघुत्तम दराने अथवा वाटाघाटी नंतर होणा-या किमान दराने कामे करुन घेणे बाबत निर्देश देण्यात आले आहेत.

०३. तथापि संदर्भाधिन.क्र.२ च्या शासन निर्णयान्वये कार्यालयीन खरेदीबाबतच्या धोरणामध्ये वाटाघाटी प्रतिबंधीत केल्याने कोणत्या निर्देशांचे पालन व्हावे याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत संदर्भाधिन.क्र.३ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

०४. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, उक्त योजनेन्तर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत ई-निविदांद्वारे कंत्राटदारांकडून कामे करुन घेताना सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी एकत्रित निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कमीत कमी दर असलेल्या एकाच कंत्राटदारास कामे दिले जात असल्याने व त्यामुळे संख्येने जास्त असलेल्या योजनांची कामे आठ आठवड्याच्या मुदतीत पुर्ण करुन घेण्यास अडचणी येत असल्याने संदर्भाधिन क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये ई-निविदा प्रक्रियेत अंशत: बदल करण्यात आला आहे. उक्त योजनेन्तर्गत कामे विहीत वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने यापुढे एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करुन एकाच कंत्राटदारास कंत्राट देण्याऐवजी निविदांद्धारे प्राप्त कमीत कमी दर निश्चित करुन निविदेतील पात्र व इच्छुक कंत्राटदारांचे पॅनेल तयार करण्याबाबत व पॅनेलवरील कंत्राटदारांमार्फत निविदेतील

संचालनालय, भू.स.वि.यं., पुणे-४११ ०
12 DEC 2018

Scanned by CamScanner

किमान दराने अथवा वाटाघाटीनंतर होणा-या किमान दराने योजनेची कामे करण्याबाबत किंवा स्वतंत्र ई-निविदा काढण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेआहेत.

०५. उक्त योजनेन्तर्गत विहीत मुदतीत कामे होण्याच्या हेतूने संदर्भिय शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले असल्याने संदर्भिय शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(चेतन निकम)
अवर सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत :

(१) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

Scanned by CamScanner